19-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 18-04-2025 22:42 Page 1



# वागातोर किनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले कासवांची घरटी वाढली

## एकूण १२ घरट्यांमध्ये १,२२७ अंडी : अंडी मोरजी संवर्धन केंद्रात सुरक्षिततेसाठी स्थलांतरित

■ टीम दैनिक हेराल्ड

**वागातोर, दि. १८ :** वागातोर समुद्रकिनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले कासवांच्या यंदाच्या प्रजनन हंगामात (डिसेंबर २०२४ ते एप्रिल २०२५) घरट्यांची लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली असून, हे या संकटग्रस्त प्रजातीसाठी एक सकारात्मक संकेत मानले जात आहे.

गोवा वन विभागाच्या आकडेवारीनुसार, यंदा एकूण १२ घरट्यांमध्ये १,२२७ अंडी घालण्यात आली असून ती सर्व अंडी मोरजी येथील संवर्धन केंद्रात सुरक्षिततेसाठी स्थलांतरित करण्यात आली आहेत. ही वाढ घरट्यांच्या बाबतीत उत्साहवर्धक असली तरी, काही घरट्यांमध्ये अंडी न घालता कासवांचे परत जाणे ही बाबही नोंदवण्यात आली आहे.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आठ ते दहा प्रकरणांमध्ये कासवे अंडी न घालता पुन्हा समुद्रात परत गेली. या वर्तनामागे समुद्रकिनाऱ्यावरील जास्त ओली वाळू, धूपामुळे निर्माण झालेले असमान पृष्ठभाग आणि खडकाळ किनाऱ्याचे भाग ही संभाव्य कारणे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष बाब म्हणजे, यंदाच्या प्रजनन हंगामात वागातोर किनाऱ्यावर कोणत्याही रेव्ह पार्ट्या आयोजित करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे कासवांना शांत व सुरक्षित वातावरण लाभले आणि त्यांचे नैसर्गिक व्यवहार सुरळीतपणे पार पडले, असे तज्ज्ञांचे मत आहे.

दोन ते तीन प्रकरणांमध्ये खडकाळ किनाऱ्यामुळे कासवांना घरटे बांधणे शक्य झाले नाही. तरीदेखील, एकूण १२ घरट्यांची नोंद ही वागाटोरसाठी लक्षणीय



आहे, असे एका वन अधिकाऱ्याने सांगितले.

तुलनात्मकदृष्ट्या, मागील वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास यंदाचा हंगाम अधिक यशस्वी ठरला आहे. जानेवारी ते एप्रिल २०२४ दरम्यान वीस घरट्यांची नोंद झाली होती, ज्यामध्ये मार्च महिन्यातच १७ घरटी बांधली गेली होती आणि एकूण १,८६८ अंडी घालण्यात आली होती. त्याच्या तुलनेत, २०२२-२३ हंगामात केवळ तीन घरटी आणि ३६४ अंडी, तर २०२१-२२ मध्ये फक्त चार घरटी आढळली होती.

गेल्या दोन वर्षांपासून वाढत्या प्रमाणात कासवांची उपस्थिती नोंदवल्यामुळे पर्यावरणीय स्थितीतील सुधारणा सूचित होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

तथापि, स्थानिक जैवविविधता कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनी या भागात योग्य पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याने चिंतेचा विषय असल्याचे म्हटले आहे. हणजूण जैवविविधता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश नाईक यांनी सांगितले, कासवे जर वागातोर किनाऱ्यावर सातत्याने घरटी करत असतील, तर गोवा वन विभाग आणि गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी यांनी याची गांभीर्याने दखल घ्यावी व येथे एक समर्पित कासव संवर्धन केंद्र स्थापन करावे.

नाईक यांनी वागातोर समुद्रकिनाऱ्याला संवेदनशील पर्यावरणीय क्षेत्र' म्हणून जाहीर करण्याची मागणी केली असून, प्रजनन हंगामात मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी शिफारसही त्यांनी केली आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की, या विषयासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी औपचारिक पातळीवर संवाद साधण्यात आला आहे आणि वागातोरमध्ये संवर्धन केंद्र स्थापनेसाठी पाठपुरावा सुरू आहे.

सध्या, वागातोर समुद्रकिनाऱ्यावर आढळणारी सर्व अंडी जवळपास २० किलोमीटर अंतरावर असलेल्या मोरजी संवर्धन केंद्रात नेली जातात. स्थानिक संवर्धनकर्त्यांचे म्हणणे आहे की, वागातोरवरच कासव संवर्धन केंद्र स्थापन केल्यास अंडी उबवण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होईल तसेच वागातोरचा कासव प्रजननस्थळ म्हणून विकासही साधता येईल.

# निवडक

## दयानंद आर्य हायस्कूलचे आज बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** श्री दयानंद आर्य हायस्कूलचा बक्षीस वितरण सोहळा शनिवार दि. १९ रोजा नेवरा येथील गोमंतक मराठी शिक्षण परिषदेच्या श्री दयानंद आर्य हास्कूलचा बक्षीस वितरण सोहळा सकाळी १० वाजता होणार असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे खासदार सदानंद तानावडे हे उपस्थित राहाणार असून त्यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात येईल. तसेच कोकण रल्वेच्या सीएसआर फंडातून पुस्कृत केलेल्या सायकलींचे वितरण प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते देणार असल्याची माहिती गोमंतक मराठी शिक्षण परिषदेचे अध्यक्ष सिद्धार्थ कुंकळ्ळीकर यांनी दिली.

त्या आदी ÷उत्तर गोवा जिल्हा परिषदेने पुरस्कृत केलेल्या श्री दयानंद आर्य हायस्कूलच्या बास्टेबॉल मैदानाचे भूमिपुजन उत्तर गोवा जिल्हा पंचायतीचे चेअरमन शंकर चोडणकर यांच्या करण्यात येणार असल्याची माहिती संस्थचे सरचिटणीस शशिकांत सावंत यांनी दिली.

तसेच या कार्यक्रमाल सेंट लॉरेंस जिल्हा पंचायतीचे सदस्य धाकू मडकईकर हे उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते उत्तर गोवा जिल्हा पंचायतीमार्फत पुरस्कृत केलेल्या डीजिटल बोर्डाचे अनावरण करण्यात येईल, अशी माहिती शाळेचे व्यवस्थापक विनोद कामत यांनी दिली.

या सोहळ्याला सन्माननिय पाहुणे म्हणून सांतआंद्रेचे आमदार तसेच नेवरा पंचायतीचे सरपंच मनीषा नाईक व आजोशी मंडूर पंचायतीचे सरपंच प्रशांत नाईक उपस्थित असतील.

---

## शिरोडा येथे शिक्षक विकास परिषदेची ३ मे रोजी सर्वसाधारण सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** शिक्षक विकास परिषद गोवा (राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या शिक्षकांची संघटना) तसेच ज्ञानदीप मंडळ, शिरोडा या दोन संस्थांची सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३ मे रोजी सकाळी ११ वाजता श्री रवळनाथ मंदिर सभागृहात शिरोडा येथे आयोजित करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक प्रा. रमेश कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सर्वसाधारण बैठकीत विविध विषयांवर चर्चा-विचार-विनिमय करण्यात येणार आहे. विषय - स्वागत, मागील सभेचा वृतांत, संस्थेच्या नोंदणीचे नुतनीकरण, सदस्यत्व नोंदणी, स्वेच्छेने उपक्रमास देणगी, गोवा राज्य कला संस्कृतीक संचालनालयाच्या सहकार्याने २९ वी राष्ट्रीय शैक्षणिक परिषद यशस्वी करणे, विद्यार्थी, पालक, शिक्षकांसाठी विविध उपक्रम, प्रदर्शन, बक्षीस वितरण, शिवाय अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे संघटनेचे प्रतिनिधी वसंतराव महाडिक यांनी सांगितले. उपस्थित सदस्यांसाठी अल्पोपहार तसेच सह-भोजनाची व्यवस्था केली आहे.

---

## हरमल येथे उद्या 'मी नथुराम गोडसे बोलतोय' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १८ :** हरमल गावचे सुपुत्र तथा गोवा कला व संस्कृती खात्याचे नाट्य प्रशिक्षक व दिग्दर्शक संजय मयेकर यांनी 'मी नथुराम गोडसे बोलतोय नाट्यनिर्मिती केली आहे.सदर नाटकाचा शुभारंभी प्रयोग रविवार दि. २० रोजी संध्याकाळी ७.३० वाजता हरमल येथील अवर लेडी ऑफ माउंट कार्मेल,ओपन एअर सभागृहात होणार असल्याचे दिग्दर्शक संजय मयेकर यानी सांगितले आहे. यावेळी श्री सिद्धेश्वर कला मंचचे दिग्दर्शक संजय मयेकर, निंमीती प्रमुख उद्देश दिलीप पेडणेकर, सहायक दिग्दर्शक गजानंद तारी, पार्श्वसंगीत प्रदीप आरोलकर यांची आहे. या नाटकात शशिकांत कोरकणकर, विनोद मेथर, अमित पेडणेकर, अशोक गवंडी, मंगल कुडव, यशवंत नाईक, संजय गडेकर, भावेश गडेकर, स्मितल बांदेकर, साहिल कौरकणकर, महादेव गावडे यांच्या भूमिका आहेत. या नाटकास रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन मयेकर यानी केले आहे.

---

## सालेली सत्तरी येथील सातेरी केळबाय देवस्थानचा २३ रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सत्तरी, दि. १८ :** सालेली सत्तरी येथील श्री सातेरी केळबाय, म्हाळसाय, ब्राम्हणी, जोगेश्वरी, पांजणमाया, रवळनाथ, वेताळ बेताळ,घाडवंश, कुणबीवंश व सहपरिवार देवता देवस्थानचा वर्धापन दिन सोहळा बुधवार दि. २३ ते शुक्रवार दि. २५ रोजीपर्यंत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात येणार आहे.

बुधवार दि. २३ रोजी सकाळी संप्रोक्षणविधान शांती, होमहवन, पुर्णाहुती अभिषेक, सत्यनारायण महापुजा, आरती, महाप्रसाद आणि गाराणे होईल. संध्याकाळी ५ वाजता श्री सिध्देश्वर दिंडी पथक, सालेलीतर्फे दिंडीचा कार्यक्रम होईल. त्यानंतर ७ वाजता नामवंत कलाकारांचा सुगम संगीताच कार्यक्रम होईल आणि ११ वाजता दशावतारी नाट्य प्रयोग सादर होईल.

गुरुवार दि. २४ रोजी सकाळी धार्मिकविधी, दुपारी महाप्रसाद, संध्याकाळी ६.३० वाजता ह.भ.प. विनोदबुवा च्यारी यांचे कीर्तन होईल. रात्री १० वाजता श्री संत सद्गुरू बाळुमामा नाटकाचा प्रयोग होईल.

शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी धार्मिकविधी, दुपारी महाप्रसाद, संध्याकाळी ६ वाजता देणगी कुपन निकाल, रात्री ८ वाजता बेतोडा महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर रात्री १० वाजता फॅमिली लय भारी या कॉमेडी नाटकाचा प्रयोग होईल. तरी सर्व भाविकानी वरील कार्यक्रमाचा लाभ ध्यावा, अशी देवस्थान समिती कडून विनंती.

# राजधानीतील मासेविक्रेत्यांचे पुनर्वसन रखडले

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** पणजी महानगरपालिकेच्या (सीसीपी) मासळी बाजारातील दुकानांचे बांधकाम पाडून जवळपास नऊ महिने उलटले, तरीही संबंधित विक्रेत्यांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. या विलंबामुळे विक्रेत्यांचे अर्थार्जन ठप्प झाले असून, त्यांच्या उपजीविकेवर मोठा परिणाम झाला आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित विक्रेत्यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी २०२५ मध्ये दिलेल्या आदेशात, विक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरुपात व्यवसाय सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यात डीप फ्रीजर, रेफ्रिजरेटर, मांस कापण्याची यंत्रणा आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्याची मुभा देण्यात आली होती. याशिवाय, तात्पुरत्या दुकानांसाठी शटर लावण्यासही परवानगी देण्यात आली होती. पाणी व वीजपुरवठा नियमित ठेवण्याचे आदेश देखील सीसीपीला देण्यात आले होते.

तथापि, प्रत्यक्षात या आदेशांची अंमलबजावणी झालेली नाही. विक्रेत्यांना अद्यापही तात्पुरती दुकाने मिळालेली नाहीत. परिणामी, अनेक विक्रेते सध्या राज्यातील इतर भागांत आपला व्यवसाय चालवण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु ग्राहकांच्या अभावामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागत आहे.तात्पुरत्या दुकानांच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार असल्याचे आम्हाला समजले आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही हालचाल दिसत नाही, असे विक्रेता मुश्ताक खतीब यांनी सांगितले. सध्या आमच्या व्यवसायाचे ५० टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. पूर्वी आम्ही शहरात होतो तेव्हा सांत क्रूझ, ताळगाव, पर्वरी , बेती यांसारख्या अनेक भागांतून ग्राहक येत असत. आता एका गावात व्यवसाय करत असल्याने ग्राहक मर्यादित झाले आहेत. पर्यटन हंगाम, ख्रिसमस, नवीन वर्ष आणि आता ईस्टरही आमच्यासाठी निष्फळ ठरले आहे, असेही त्यांनी नमूद केले. विक्रेत्यांच्या मागणीनुसार लवकरात लवकर तात्पुरते दुकान उभारून त्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी पुनर्स्थापित करावे, अशी अपेक्षा आता अधिक तीव्र होत चालली आहे.



# फोंडा शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव गंभीर

संतोष नाईक
■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १८ :** फोंडा शहर तसेच परिसरातील गावांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवारी सकाळी भटक्या कुत्र्यांच्या हल्लयात एका चिमुकलीचा दुर्दैवी बळी गेल्यानंतर स्थानिक नागरिकांनी दु:ख आणि संताप व्यक्त केला आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, कुत्रा हा निष्ठावान प्राणी असला तरी भटक्या कुत्र्यांचा वाढता त्रास हा सध्या जनजीवनासाठी मोठा धोका बनला आहे. फोंडा उपजिल्हा रुग्णालयाच्या नोंदीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून दरमहा सरासरी ८० ते ९० कुत्र्यांच्या चाव्याच्या घटना समोर येत आहेत. हे प्रमाण लक्षात घेता तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

फोंडा येथील सामाजिक कार्यकर्ते विराज सप्रे यांनी सांगितले की, शहरातील प्रत्येक वसाहत, वॉर्ड आणि गावांमध्ये भटक्या कुत्र्यांचे कळप खुलेपणाने फिरताना दिसतात. हे कुत्रे दुचाकीस्वार, पादचारी तसेच लहान मुलांचा पाठलाग करतात, उड्या मारतात आणि बऱ्याच वेळा आक्रमक वर्तन करतात. सरकारने या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. लोकांना भटक्या कुत्र्यांच्या दयेवर सोडू नये. भटक्या प्राण्यांसाठी सरकारने स्वतः पुढाकार घेऊन निवारा गृहे उभारली पाहिजेत व त्यांच्या आहाराची व्यवस्था केली पाहिजे, असे सप्रे म्हणाले.

फोंडा नगरपरिषदेचे अध्यक्ष आनंद नाईक यांनी लहान मुलीच्या मृत्यूबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत सांगितले की, महापालिका एनजीओच्या सहाय्याने नियमितपणे भटक्या कुत्र्यांची नसबंदी करते. मात्र, नसबंदी झाल्यानंतर त्याच ठिकाणी कुत्र्यांना पुन्हा सोडले जाते. त्यामुळे समस्या कायम आहे.

नगरसेवक रितेश नाईक यांनी सांगितले की, फोंडा नगरपरिषदेने पशुसंवर्धन विभागाला गोवा डेअरीजवळ कुत्र्यांच्या निवारासाठी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे. तसेच त्यांनी नागरिकांना रस्त्यावर उघड्यावर अन्न व कचरा टाकू नये, असे आवाहन केले.पीडित बालकाचे शेजारी राजेश नाईक म्हणाले की, ही अतिशय वेदनादायक घटना असून आता सरकारने अशा घटनांना आळा घालण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे.एकनाथ फडते यांनी सांगितले की, भटक्या कुत्र्यांसाठी निवारा गृहे उभारून त्यांना योग्य अन्न व वैद्यकीय सेवा दिली गेली पाहिजे. तसेच पाळीव कुत्र्यांची गरज असणाऱ्यांनी या निवारा गृहांमधून कुत्रे दत्तक घ्यावेत.

# 'स्किल-ऑन-व्हील्स' उपक्रमाला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** औद्योगिक आणि व्यावसायिक सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते स्किल-ऑन-व्हील्स' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. २ कोटी रुपये खर्चून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन सुरक्षितता कौशल्ये विकसित करणे आहे.

बांबोळी येथील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम येथे आयोजित गोवा व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य प्रदर्शन व शिखर परिषद २०२५ च्या उद्घाटन सोहळ्यात या उपक्रमाची सुरुवात झाली. कारखाने आणि बॉयलर्स निरीक्षकांनी आयोजित केलेल्या या तीन दिवसीय परिषदेत कारखाने आणि बॉयलर्स मंत्री नीलकंठ हळर्णकर , सचिव (कारखाने आणि बॉयलर्स) संजीत रॉड्रिग्ज, तसेच मुख्य निरीक्षक अनंत पांगम उपस्थित होते.

मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी 'स्किल-ऑन-व्हील्स' या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, या प्रशिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण भागातील तरुणांना प्रत्यक्ष औद्योगिक सुरक्षिततेचे ज्ञान मिळेल, जे भविष्यात एक सुरक्षित आणि मजबूत गोवा घडविण्यास मदत करेल.

हा उपक्रम आगामी काही महिन्यांत शैक्षणिक संस्था, स्थानिक उद्योग, तसेच सामुदायिक गटांशी समन्वय साधून विविध तालुक्यांमध्ये राबविण्यात येणार आहे.

मोबाईल प्रशिक्षण युनिटच्या माध्यमातून औद्योगिक सुरक्षिततेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये औद्योगिक अग्नि सुरक्षा, विद्युत धोका व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यावर विशेष भर,विद्यार्थ्यांना सुरक्षा प्रोटोकॉल आणि आपत्ती तयारीसंदर्भात मूलभूत प्रशिक्षण देणे, औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील कामगारांना सुरक्षिततेचे अद्ययावत प्रशिक्षण उपलब्ध करणे अशी या उपक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत

मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी नमूद केले की, हा उपक्रम केवळ शहरी भागापुरता मर्यादित न राहता ग्रामीण स्तरावरही औद्योगिक सुरक्षा शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न आहे. तरुण आणि कामगारांमध्ये सुरक्षिततेबाबतची जाणिव वाढवून त्यांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडविणे हेच या उपक्रमाचे अंतिम ध्येय आहे.

# सांडपाणी व्यवस्थापनप्रकरणी उच्च न्यायालयाची कोअर कमिटीला सूचना

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** मडगाव शहरातील नाल्यांमध्ये होत असलेल्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीबाबत स्थापन करण्यात आलेल्या कोअर कमिटीला, सार्वजनिक बांधकाम विभाग, मडगाव नगर परिषद आणि गोवा सीवरेज अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या समन्वयाने सविस्तर नकाशा तयार करून सादर करण्याचे निर्देश गोवा खंडपीठाने दिले आहेत.

उच्च न्यायालयात प्रा. अँटोनियो अल्वारेस यांनी सादर केलेल्या सालपे तलाव प्रदूषणप्रकरणी दाखल जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान हे निर्देश देण्यात आले. या नकाशामध्ये मडगाव नगर परिषदेच्या हद्दीतील कोणते क्षेत्र सांडपाणी व्यवस्थापनाशी जोडलेले आहे व कोणते नाही, याचे स्पष्ट दर्शन अपेक्षित आहे. सदर नकाशा तयार करण्यासाठी न्यायालयाने ८ मे २०२५ ही अंतिम मुदत दिली आहे. त्याचप्रमाणे, नगर परिषदेने देखील अद्याप सांडपाणी योजनेत समाविष्ट न झालेल्या आणि समाविष्ट क्षेत्रांचा आढावा घ्यावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

सुनावणीदरम्यान, न्यायालयाने हेही सूचित केले की कोअर कमिटीने मे २०२५ च्या पहिल्या आठवड्यात बैठक घेऊन, सखल भागातील सांडपाण्याचे निचरा मार्ग (ड्रेनेज) आणि व्हॅक्युम तंत्रज्ञानाच्या व्यवहार्यतेचा अहवाल सादर करावा. पीडब्ल्यूडीकडून हा व्यवहार्यता अहवाल एप्रिल अखेरीस मिळण्याची अपेक्षा असून, त्यानंतर पुढील आवश्यक पावले उचलली जातील, अशी माहिती न्यायालयाला देण्यात यावी.

दरम्यान, मडगाव नगर परिषदेच्या वतीने हजर असलेल्या वकिलांनी न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात, आधी सील करण्यात आलेल्या इमारतींबाबत प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, १६ व्यावसायिक व १५४ निवासी बांधकामांवर कारवाई सुरू आहे, असे नमूद केले. या प्रक्रिया १५ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासनही न्यायालयाला देण्यात आले.

शहराच्या सखल भागांमध्ये सांडपाणी व्यवस्थेसाठी व्हॅक्युम तंत्रज्ञानाच्या वापराबाबत, हे तंत्रज्ञान मर्यादित जागा आणि उच्च पाण्याच्या पातळीच्या भागांसाठी योग्य असल्याचे सादर करण्यात आले. तथापि, सध्या या यंत्रणेची व्यवहार्यता तयार केली जात असून, अद्याप संबंधित अहवाल सादर करण्यात आलेला नाही, अशी माहिती अमिकस क्युरीने दिली. हा अहवाल एप्रिल अखेरीस अपेक्षित असून, त्यानंतर पुढील निर्णय घेतले जातील.

कार्यवाही दरम्यान, एमएमसीच्या कायदेशीर वकिलांनी एक प्रतिज्ञापत्र सादर केले ज्यामध्ये उल्लंघनांमुळे पूर्वी बंद केलेल्या परिसरांना सील करण्याची प्रक्रिया पुढे नेण्याच्या महानगरपालिकेच्या योजनेची रूपरेषा दिली गेली. प्रतिज्ञापत्रात १६ व्यावसायिक आणि १५४ निवासी संरचनांना आधीच जारी केलेल्या नोटिसांवर निर्णय घेण्याच्या दृष्टिकोनाचे तपशीलवार वर्णन केले गेले. सादरीकरणानुसार, एमएमसी ही संपूर्ण प्रक्रिया १५ मे रोजी किंवा त्यापूर्वी पूर्ण करण्याचा मानस आहे.

व्हॅक्यूम सीवरेज तंत्रज्ञानाच्या संभाव्य परिचयाचे मूल्यांकन करण्यासाठी केलेल्या पूर्वीच्या सर्वेक्षणाची देखील न्यायालयाला माहिती देण्यात आली - उच्च पाण्याची पातळी आणि अवकाशीय अडचणी असलेल्या प्रदेशांसाठी योग्य असलेली एक पूर्णपणे स्वयंचलित प्रणाली. तथापि, एमिकस क्युरीने निदर्शनास आणून दिले की या आघाडीवरील प्रगती थांबली आहे, पीडब्ल्यूडीने अद्याप त्याचे व्यवहार्यता मूल्यांकन अंतिम केलेले नाही. सरकारी वकिलांनी खंडपीठाला माहिती दिली की अहवाल हाती आल्यानंतर महिन्याच्या अखेरीस पुढील पावले उचलली जातील.

न्यायालयाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात, अमिकस क्युरीने अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी अनेक निर्देशांची मागणी केली. गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि नगर परिषद यांनी केवळ सांडपाणी कनेक्शन किंवा सोक पिटची भौतिक पडताळणी केल्यानंतरच डी-सील करण्यास परवानगी द्यावी.दिनांक ०१ एप्रिल २०२५ च्या प्रतिज्ञापत्रानुसार, १६ संरचना सील करण्याची प्रक्रिया एक आठवड्याच्या आत पूर्ण करावी.निवासी आस्थापनांना जारी केलेल्या कारणे दाखवा नोटिसांचे निवारण ०१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करावे. ११६६ ते ११७५ क्रमांकाच्या नोटिसांचे अंतिम निवारण ०१ जून २०२५ पर्यंत पूर्ण करावे. १९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार, १५ मे २०२५ पर्यंत जारी करण्यात आलेल्या सर्व निर्देशांचे पालन करण्याचे निर्देश परिषदेला द्यावेत. तसेच पीडब्ल्यूडी आणि एसआयडीसीजीएल यांना, सखल भागात आणि वीज जोडणी नसलेल्या ठिकाणी सांडपाणी नाल्यांमध्ये सोडण्याबाबत तात्काळ (तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी) उपाययोजना करण्याचे आदेश द्यावेत.अशा मागण्यांचा समावेश आहे.

